ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख ४ मे, १९५५ | अंक १८

## विविध माहिती

**वार्ताहरांची कामगिरी**—इंडोनेशिआंतील बांडुंग येथें भरलेल्या आशिअन–आफ्रिकन राष्ट्रांच्या परिषदेसाठी निरनिराळ्या देशांतील ६५५ वार्ताहर जमा झाले होते व ते रोज २,८०,००० शब्द वार्तांच्या रूपानें पाठवीत असत. त्याशिवाय आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या परदेशीय व इंडोनेशिअन वृत्तसंस्था मिळून दररोज १,८०,००० शब्द तारेनें पाठवीत असत.

**भिलई येथें तांत्रिक शिक्षणाची शाळा**—मध्यप्रदेशांतील भिलई येथ काढण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्याची अंतिम रूपरेषा निश्चित झाली म्हणजे त्या ठिकाणीं तांत्रिक शिक्षण देणारी एक शाळा उघडण्यांत येणार आहे गैरवाकबगार कामगारांना तांत्रिक कामें करण्याचें शिक्षण ह्या शाळेंत देण्यांत येणार आहे.

**पोस्ट व टेलिग्राफच्या कामाचें तांत्रिक शिक्षण**—पोस्ट व टेलिग्राफ ह्या खात्याला लागणाऱ्या लोकांना शिक्षण देण्यासाठी भारतीय सरकार बडोदा येथें एक तांत्रिक शिक्षणाचें कॉलेज स्थापन करणार आहे. कॉलेजच्या इमारतसाठी १५ लाख रुपये खर्च येईल, आणि कॉलेज चालविण्यासाठी दरवर्षी ६०,००० रुपये खर्च येईल मुंबई, राजस्थान, सौराष्ट्र आणि कच्छ ह्या राज्यांतील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यांत येईल.

**रत्नागिरी जिल्ह्यांतील वाळूची निर्यात**—रत्नागिरी जिल्ह्यांतील कांहीं गांवांहून कांहीं खाजगी कंपन्या खनिजें असलेल्या वाळूची निर्यात गेलीं तीन वर्षें करीत आहेत. अशा प्रकारची वाळू निर्यात करण्यास परवाना-पद्धति लागू करण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे. सरकारतर्फें पाठविण्यांत आलेल्या भूस्तरशास्त्रज्ञानें वाळूचा अभ्यास केला आहे.

**हुबळी येथें आगगाडीचे डबे होणार**—हुबळी येथील रेल्वेच्या कारखान्यांत अरुंद रुळाच्या रेल्वेसाठीं लागणारे डबे लवकरच तयार करण्यांत येऊं लागतील. असे डबे तयार करण्यास हुबळीच्या कारखान्यांत चांगला वाव आहे. त्यासाठी कारखान्यांचा कांहींसा विस्तार करावा लागेल. विस्तार करण्याची १०३ लाख रुपये खर्च येणारी योजना तयार करण्यांत आली आहे.

**उत्तर गुजरातमधील योजना**—उत्तर गुजरातमधील बानस नदीवर धरण बांधून शेतीला पाणी–पुरवठा करण्याची एक मोठी योजना मुंबई सरकारनें तयार केली आहे. ह्या योजनेला ६·२५ कोटी रुपये खर्च येईल आणि अडवलेल्या पाण्यामुळें २,९५,००० एकर जमिनीला पाणीपुरवठा होईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत धरण हातीं घेण्यांत यावें, असें मुंबई सरकारचें म्हणणें आहे.

**बचतीची नवी योजना**—मध्यम वर्गीय लोकांत काटकसर करण्याच्या व बचत करण्याच्या वृत्तीचा प्रसार व्हावा म्हणून भारतीय सरकारच्या अर्थ–खात्यानें एक योजना तयार केली आहे. प्रत्येक मध्यमवर्गीय कुटुंबाला मोहोरबंद असणारी एक छोटी पेटी पुरविण्यांत येईल. महिनाअखेर सरकारचे बचत अधिकारी पेटींत शिल्लक टाकण्यांत आलेल्या रकमेची नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स त्या कुटुंबाला देतील.

**गिरनार पर्वतावरील सिंह**—गेल्या वर्षांत गिरनारच्या जंगलांतील सिंहांची संख्या वाढली असल्याचें समजतें. आतां जंगलांत सुमारें २९० सिंह असतील असा अंदाज आहे. १९५१ सालीं त्यांची संख्या २५० होती. तथापि, १९५१ सालीं सिंहांच्या बच्चांची संख्या एकूण संख्येच्या २५ टक्के होती. आतां हें प्रमाण कमी म्हणजे १४ किंवा १५ टक्के झालें आहे.

**सहकारी बँकेची १३ वी शाखा**—सौराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. रसिकलाल पारेख ह्यांनीं जुनागड येथें सौराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँकेच्या १३ व्या शाखेचें उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले कीं, भारतांत समाजवादी पद्धतीची समाजरचना करण्याच्या कामांत सहकारी चळवळीच्या प्रसाराचें फार महत्त्व आहे.

**नांवें न सांगितल्याचा परिणाम**—भारतामधील गेल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळीं मतदारांच्या याद्यांत ८ कोटी स्त्री–मतदारांचीं नांवें होती. पण; त्यांपैकीं २८ लाख स्त्रियांची नांवें याद्यांतून काढून टाकण्यांत आलीं आहेत. ह्या स्त्रियांनीं मतदानाच्या वेळीं आपलें नांव सांगण्यास नकार दिल्यामुळें हा उपाय योजावा लागला.

**कृत्रिम तांदुळाचा पहिला कारखाना**—म्हैसूर येथें कृत्रिम तांदूळ तयार करण्याचा भारतामधील पहिला कारखाना येत्या जुलै महिन्याच्या अखेरपर्यंत उभारण्यांत येणार आहे. हा कारखाना अर्थातच प्रायोगिक स्वरूपाचा राहील, आणि त्याचें तांदुळाचें दैनिक उत्पादन सुमारें २ टन असेल. तथापि कारखान्याची उत्पादनक्षमता ह्याहून अधिक आहे.

**रेल्वेच्या सामानाच्या शोरूम्स**—मुंबई, मद्रास, दिल्ली आणि कलकत्ता ह्या चार शहरांतून परदेशाहून भारतीय रेल्वेजसाठीं आयात केल्या जाणाऱ्या मालाच्या शोरूम्स उघडण्यांत येणार आहेत. हा उपक्रम रेल्वे इक्विपमेंट कमिटीच्या सूचनेप्रमाणें करण्यांत येत आहे. रेल्वेला लागणाऱ्या सामानाच्या बाबतींत भारत शक्य तितका स्वावलंबी बनविण्यासाठीं कमिटी शिफारसी करीत असते.

### राज्य सहकारी बँका ( १९५२–५३ )

| | | सबंध भारत | मुंबई राज्य |
|---|---|---|---|
| कचेऱ्या | | १२७ | ६८ |
| सभासद–सोसायट्या | | १६,१६४ | ५,५२४ |
| दिलेलीं कर्जें | (लक्ष रु.) | ३९,९३ | १३,१५ |
| वसूल कर्जें | ,, | ४०,६५ | १४,५४ |
| येणें कर्जें | ,, | १८,८७ | ५,१० |
| थकबाकी | ,, | ३,२८ | ८६ |
| रोख, इन्व्हेस्टमेंट | ,, | १६,९५ | ६,६३ |
| भाग भांडवल | ,, | २,१७ | ६० |
| नफा | ,, | २,०१ | ८५ |
| ठेवी | ,, | २४,१९ | ९,२६ |
| घेतलेलीं कर्जें | ,, | ९,५५ | १,२४ |
| खेळतें भांडवल | ,, | ३८,६४ | ११,६४ |

### मध्यवर्ती बँका ( १९५२–५३ )

| | | सबंध भारत | मुंबई राज्य |
|---|---|---|---|
| कचेऱ्या | | ७९० | १९३ |
| सभासद–सोसायट्या | | ११७,९७९ | ९,६७६ |
| दिलेलीं कर्जें | (लक्ष रु.) | ६५.५८ | १४,४८ |
| वसूल कर्जें | ,, | ६४,९० | १४,६० |
| येणें कर्जें | ,, | ३५,९३ | ६,३६ |
| कॅश, इन्व्हेस्टमेंट | ,, | २३,९७ | ७,२३ |
| स्वतःचें भांडवल | ,, | १०,१६ | २,१२ |
| खेळतें भांडवल | ,, | ६१,२३ | १५,२३ |

### अर्बन क्रेडिट सोसायट्या ( १९५२–५३ )

| | | सबंध भारत | मुंबई राज्य |
|---|---|---|---|
| सोसायट्या | | ८,२३४ | १,५९२ |
| सभासद | | २५,१५,१२० | ८,७३,८३२ |
| दिलेलीं कर्जें | (लक्ष रु.) | ५४,३४ | २७,८७ |
| वसूल कर्जें | ,, | ५०,८४ | २५,९८ |
| येणें कर्जें | ,, | ४७,१७ | १७,४७ |
| थकबाकी | ,, | ५,०३ | १,४६ |
| स्वतःचें भांडवल | ,, | २१,०६ | १०,०१ |
| खेळतें भांडवल | ,, | ६३,३८ | २९,७४ |
| रोख, इन्व्हेस्टमेंट | ,, | १९,२६ | १२,१४ |

### युनायटेड कमर्शिअल बँकेची प्रगति

१९५४ मध्यें युनायटेड कमर्शिअल बँकेनें सर्व बाजूंनीं प्रगति केली आहे. ताळेबंदाच्या बेरजेंत ४·२५ कोटी रुपयांची वाढ झाली आहे व ठेवी २·७० कोटी रुपयांनीं वाढल्या आहेत. कर्जें ३·७५ कोटी रुपयांनीं वाढून तीं २४ कोटी, ८४ लक्ष रु. झालीं आहेत. बँकेचें उत्पन्न २१७ लक्ष रु. होऊन निव्वळ नफा ३१ लक्ष रु. उरला. डिव्हिडंडचा दर पूर्वीचीं चार वर्षे ४% होता, तो ५% करण्यांत आला. बँकेचें वसूल भांडवल २ कोटी रु. असून गंगाजळींत ८६·५० लक्ष रुपये आहेत. ताळेबंद ६२ कोटी रुपयांचा आहे.

### बावची ग्रामपंचायतीचा गौरव

बावची ( द. सातारा ) ग्रामपंचायतीनें, स्थापनेपासून उत्तम तऱ्हेची कामगिरी करून दाखविल्याबद्दल, सरकारनें जिल्हाधिकाऱ्यांचे हस्तें, चांदीचा कप बक्षिस दिला. आदर्श सेक्रेटरी म्हणून, श्री. कुतुबुद्दीन अबदुल मुल्ला यांचा कलेक्टरांनीं गौरव केला.


## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ / तारेचा पत्ता : फार्मरबैंक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

भागीदारांतर्फे रु. ३४,०६,७५०
मुंबई सरकारतर्फे रु. २६,००,०००

रु. ६०,०६,७५०

गंगाजळी व फंड रु. ५७,५४,८००
ठेवी रु. ७,९०,२५,३००
खेळतें भांडवल रु. १२,७०,२७,०००

**१६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. ह. ब. गिरमे ( उपाध्यक्ष )

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ४,००,०००
रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह रु. १,००,०००

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. ४ मे, १९५५



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

## भारतांतील बड्या नऊ बँका

### हिंदी बँकिंगच्या सुदृढ प्रगतीचा विश्वास

वीस कोटी रुपयांपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या, अशा आतां नऊ हिंदी व्यापारी बँका आहेत. त्या खालीलप्रमाणें:—

| बँक | ठेवी (कोटी रु.) |
|---|---|
| १ इंपीरिअल बँक | २३१·३६ |
| २ सेंट्रल बँक ऑफ इंडिया | १२३·९७ |
| ३ बँक ऑफ इंडिया | ६०·३८ |
| ४ पंजाब नॅशनल बँक | ७५·६४ |
| ५ युनायटेड कमर्शिअल बँक | ४०·७२ |
| ६ बँक ऑफ बरोडा | ३४·८५ |
| ७ अलाहाबाद बँक | ३३·०२ |
| ८ युनायटेड बँक ऑफ इंडिया | ३०·४८ |
| ९ इंडियन बँक | २४·८५ |

ह्या सर्व नऊ बँकांकडे मिळून एकूण ६३४·९६ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. १९५२ च्या मानानें ठेवींत ६२·४१ कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. इतर बँकांकडून घेतलेल्या कर्जात ७७·८९ लक्ष रुपयांची वाढ होऊन त्या कर्जाची रक्कम ९·८७ कोटी रुपये झाली. कॅश रिसोर्सेसमध्यें २३·२९ कोटी रुपयांची भर पडली. इनव्हेस्टमेंटसमध्यें १३·८५ कोटी रुपयांची वाढ आहे, ती मुख्यतः इंपीरिअल बँकेनेंच केलेली आहे. दिलेलीं कर्जे २८·७३ कोटी रुपयांनीं वाढून तीं ३२९·५ कोटी रुपयांवर गेलीं आहेत. निव्वळ नफा १०% नें सुधारून ४·०६ कोटी रुपयांचा ४·४८ कोटी रुपये झाला.

१९५४ मधील वाढींचे हे आकडे निरोगी प्रगतीचे निदर्शक गणले जातील. फाजील चलनविस्तारामुळें तात्कालिक फुगवटा निर्माण होतो व त्याचे परिणामहि हितावह होत नाहींत; तशी ही परिस्थिति नाहीं. पंचवार्षिक योजनेखालील खर्चाला फळें येऊं लागलीं आहेत, त्याचें हें प्रत्यंतर समजलें पाहिजे. भारतांतील आर्थिक व्यवहार पुरेसे सुसंघटित असते, पैशाचा बाजार सुनियंत्रित असता आणि बँकिंगचा प्रसार सर्वत्र झालेला असता तर हें प्रत्यंतर ह्यापूर्वींच, अधिक स्पष्टपणें, आलें असतें. भारतांतील विशिष्ट परिस्थितीमुळेंच पैसा परत बँकांकडे वळण्यास वेळ लागत आहे. तथापि, पहिल्या पंचवार्षिक योजनेची अखेरी आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची आखणी, ह्यांमुळें पैशाचा हा ओघ वाढत जाईल ह्यांत संशय नाहीं.

बड्या नऊ बँकांपैकी प्रत्येकीच्याच ठेवी वाढल्या आहेत व नफा अधिक झाला आहे. बहुतेक सर्वांनीं कर्जें जास्त दिलीं आहेत, पण त्यामुळें रोकड रकमांत घट पडूं दिलेली नाहीं. स्वीकारलेल्या ठेवींवर जास्त दरानें व्याज द्यावें लागलें व पगारखर्च वाढला, तरी १९५४ हें वर्ष सर्वच बँकांना चांगलें गेलेलें आहे. ठेवींवर कमाल व्याज किती द्यावें व कर्जावर किमान व्याज किती घ्यावें ह्याविषयीं रिझर्व्ह बँकेनें बँकांना सूचक मार्गदर्शन करावें, असें बँकिंग क्षेत्रांत बोललें जात आहे. श्री. प्राणलाल देवकरण नानजी ह्यांनीं, इंडियन बँक्स असोसिएशनच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत, ह्या प्रश्नांचा आग्रहपूर्वक उल्लेख केला होता व गुप्त गंगाजळी वाढविण्याचें अगत्यहि त्यांनीं प्रतिपादन केलें होतें. हिंदी बँकिंग प्रगतीचे मार्गावर असून, त्याच्या उज्ज्वल यशाचा पाया आतां घातला गेला आहे आणि योग्य ती दक्षता घेतली तर प्रगतीचा वेग परिणामकारक रीतीनें वाढेल असा विश्वास उत्पन्न झाला आहे, असें मोठ्या बँकांच्या व्यवहाराचे आकडे दर्शवितात.

---

## जगांतील लोकसंख्या वाढत आहे

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या तज्ज्ञांनीं १९५४सालचें लोकसंख्याविषयक सांवत्सरिक प्रसिद्ध केलें आहे. ह्या सांवत्सरिकांत जनन, मृत्यु, विवाह, लोकसंख्येचा दाटपणा आणि स्थानांतर, इत्यादि बाबींविषयीं बरीच विस्तारपूर्वक माहिती देण्यांत आली आहे. १९२० ते १९५१ हा कालखंड अभ्यासाकरतां घेऊन त्या कालांतील १८३ देशांची लोकसंख्याविषयक माहिती वार्षिकांत देण्यांत आली आहे. अभ्यासाचा निष्कर्ष म्हणून त्यांनीं असा अंदाज केला आहे कीं दीर्घायुर्मानाची वाढत जाणारी प्रवृत्ति आणि लहान मुलांच्या मृत्यूंच्या संख्येंत होणारी घट ह्या दोन कारणांनीं जगाची लोकसंख्या भविष्यकाळांत वाढतच जाईल. १९५३ सालीं जगाची लोकसंख्या २५४·७ कोटी होती. सोव्हिएट रशिआ आणि पूर्व-युरोप ह्या भागांतील लोकसंख्येबद्दल तपशीलवार आंकडे मिळत नाहींत; फक्त एकूण लोकसंख्येचे आंकडेच उपलब्ध आहेत. वार्षिकांत नमूद करण्यांत आलेले कांहीं प्रमुख मुद्दे असे आहेत. (१) युद्धोत्तरकालांत जननाचें प्रमाण उंचावलें होतें. पण आतां तें परत खालीं जात आहे. तथापि बहुतेक देशांतून तें १९३९ च्या प्रमाणापेक्षा अधिक आहे. (२) जन्मतःच मेलेल्या मुलांचें प्रमाण एकंदरीनें कमी होत चाललें आहे. (३) आयुर्मानाची अपेक्षा बरीच वाढली आहे. (४) मध्य-युरोपांत लोकसंख्येची वस्ती दर चौरस किलोमीटरमागें १२९ म्हणजे जगांतील इतर कोठल्याहि भागापेक्षा अधिक आहे. दाट अगर विरळ वस्तीचा विचार करतां खंडशः युरोपचा नंबर पहिला लागतो. युरोपमध्यें चौरस किलोमीटरमागें ८२ लोक रहातात. आशिआंत ५१ रहातात. दोन्ही अमेरिकांत ८ रहातात आणि आफ्रिकेंत ७ रहातात. १९४९ ते १९५१ ह्या कालांत देशांतर करणाऱ्या लोकांची संख्या अधिकांत अधिक झाली. तेव्हांपासून १९५३ अखेर देशांतर करणारांची संख्या कमी होत चालली आहे.

---

## विदेशी फर्म्सनीं गुंतविलेल्या रकमा व नेलेले नफे

विदेशी फर्म्सनीं १९५४ मध्यें नफ्याचे एकूण १९ कोटी, २२ लक्ष रुपये भारताबाहेर पाठवले. १९५३ मधील नफ्याची ही निर्गत १६ कोटी, ६७ लक्ष रुपयांची झाली होती. १९५४ मध्यें विदेशी कंपन्यांनीं ५९ लक्ष रुपये भारतांत गुंतविले; १९५३ मधील तत्सम आकडा १ कोटी, ५४ लक्ष रुपये होता.

## खोटा चेक दिल्यानें फसवणुकीचा गुन्हा केव्हां घडतो ?

एका दुकानदाराकडून 'अ' नें कांहीं कापड खरेदी केलें व त्याच्या किंमतीचा चेक दिला. दुकानदारानें चेक बँकेंत दाखल केला, पण त्याचे पैसे मिळूं शकले नाहींत. चेक दाखल करण्याचे दिवशीं व त्यापूर्वीं कांहीं दिवस 'अ' च्या बँक-खात्यांत पैसे नव्हते हें दुकानदाराला ठाऊक झालें. त्यानें 'अ' वर फौजदारी केली. 'अ' नें कोर्टांत सांगितलें, कीं बँक खात्यांत किती पैसे आहेत, ह्याची मला पूर्ण कल्पना नव्हती; खोटा चेक चुकून दिला गेला. मॅजिस्ट्रेटनें हें अमान्य केलें; दुकानदाराला खोट्या चेकवर विश्वास ठेवून कापड देण्यास 'अ' नें लावलें; दुकानदाराची फसवणूक केली म्हणून 'अ' वर गुन्हा शाबीत झाला.

आतां दुसरें उदाहरण पाहा:—दुकानदाराकडून 'अ' उधारीनें कापड घेत आला आहे. दुकानदार उधारी वाढविण्यास तयार नाहीं व दिवाणी दाव्याचा तो धाक दाखवींत आहे. त्याला शांत करण्यासाठीं 'अ' नें त्याला खोटा चेक दिला, तो बँकेंतून परत आला. दुकानदारानें 'अ' वर फौजदारी केली. 'अ' नें कबूल केलें कीं, त्यानें कापड घेतलें व चेक दिला. पण त्याचें म्हणणें असें कीं, चेकच्या आधारावर दुकानदारानें कापड विकलें नाहीं; त्यानें कापड अगोदरच दिलेलें होतें. चेक दिल्यामुळें दुकानदाराची फसवणूक झालेली नाहीं. पैसे लवकर वसूल करण्यासाठीं दुकानदारानें ही फौजदारी केलेली आहे. मॅजिस्ट्रेटनें निवाडा केला कीं, खोटा चेक दिल्यामुळें दुकानदाराचें कांहीं नुकसान झालेलें नाहीं; चेकच्या भरंवशावर कापड देण्यांत आलेलें नाहीं; तें चेक देण्याच्या आधींच पुरविलेलें आहे. चेकमुळें दिवाणी दाव्याचा मार्ग अडलेला नाहीं. हा दिवाणी स्वरूपाचाच व्यवहार आहे. पुढील तारखेचा चेक म्हणजे आधीं घेतलेल्या कापडाचे पैसे कांहीं दिवसांनीं देण्याचें केवळ आश्वासन आहे; हें आश्वासन 'अ' नें पाळलें नाहीं हें खरें आहे; पण म्हणून केवळ तो फौजदारी स्वरूपाचा गुन्हा होत नाहीं. नैतिक दृष्ट्या ती फसवणूक असली, तरी कायद्याच्या दृष्टीनें नाहीं.

"आपल्या बँक-खात्यांत पैसे नाहींत हें माहीत असतांहि पुढील तारखेचा चेक एकाद्यानें दिला, तर तें फसवणुकीच्या सदरांत पडतेंच असें नाहीं. चेक बँकेंत दाखल होण्याच्या दिवसापर्यंत बँक-खात्यांत पैसे भरण्याचा त्याचा हेतु असेल, हें गृहीत धरावयास पाहिजे." न्यायमूर्ति ब्लॅकेट ह्यांनीं अशा आशयाचे उद्गार एकदा काढले आहेत.

—एन. के. एफ. सनदुक

('यू ॲंड दि लॉ', दि टाइम्स ऑफ इंडिया)

### पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि.

वरील कंपनीला ३१ डिसेंबर, १९५४ अखेर संपलेल्या वर्षी ८,५६,४२२ रु. नफा झाला. भागीदारांना प्रत्येक भागावर ३ रु. ८ आ. करमाफ डिव्हिडंड मिळालें. कंपनीच्या प्रगतीचा तक्ता खालीं दिला आहे:—

| वर्ष | विजेचे ग्राहक | खपलेली वीज (लक्ष युनिट) | मिळालेले उत्पन्न (लक्ष रु.) |
|---|---|---|---|
| १९५४ | ३२,५५१ | ५६५ | ४५ |
| १९५३ | ३०,८११ | ५५६ | ४१ |
| १९५२ | २९,४१२ | ५०७ | ३५ |
| १९५१ | २७,८२८ | ५१२ | ३७ |
| १९५० | २५,५८२ | ४९२ | २८ |

**इंदूरच्या स्टेशनांत सुधारणा**—इंदूरच्या स्टेशनाच्या इमारतींत सुधारणा करून प्रवाशांच्या सुखसोई वाढविण्यासाठीं ८,५०,००० रुपयांची रक्कम खर्च करण्यांत येणार आहे. वरिष्ठ व कनिष्ठ वर्गाच्या प्रवाशांसाठीं खोल्या, शाकाहारी व मांसाहारी भोजनगृहें, चौकशीची कचेरी आणि जागा राखून ठेवण्याची व्यवस्था ह्या सोयी करण्यांत येणार आहेत. पावसाळा सुरू होण्यापूर्वीं ही योजना पूर्ण करण्यांत येईल.

**बुद्धाची २,५०० वी जयंति**—भगवान् गौतमबुद्धाची २,५०० वी जयंति पुढील वर्षी साजरी करण्यांत येणार आहे. ह्या समारंभाची व्यवस्था करण्यासाठीं भारतीय सरकारनें ५ जणांची एक कमिटी नेमली आहे. बनारसजवळील सारनाथ येथें आणि बिहारमधील बुद्धगया ह्या ठिकाणीं समारंभ करण्यांत येणार आहेत. त्या प्रसंगीं भारताबाहेरील ४,००० बौद्ध भिक्षु येतील असा अंदाज आहे.

**ब्रह्मदेशाला चीनची मदत**—चीनचें सरकार ब्रह्मदेशाला कापडाच्या व सुताच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री पुरविणार आहे आणि त्या उभ्या करण्यासाठीं तंत्रज्ञांची मदतहि देणार आहे. गेल्या महिन्यांत पेकिंग येथें उभयता देशांत व्यापारी वाटाघाटी झाल्या, त्यावेळीं ब्रह्मदेशातर्फे यंत्रसामुग्री पुरविण्याची विनंती चीनला करण्यांत आली होती.

**नारळाच्या बागाइतदारांना मदत**—त्रावणकोर-कोचीन राज्यांत नारळाची बागायत मोठ्या प्रमाणावर आहे. पण गेल्या कांहीं दिवसांत नारळ व खोबऱ्याचें तेल ह्यांच्या किंमतींत एकदम खूप उतार झाल्यामुळें नारळवाल्यांची परिस्थिति कष्टाची झाली आहे. नारळवाल्यांना भारतीय सरकारकडून कांहीं मदत मिळविण्याचे प्रयत्न राज्य-सरकार करणार आहे.

"कण आणि क्षण"चें गुजराती भाषांतर
સુખી જીવનની પગદંડી
અથવા
ગૃહજીવનનુ માંગલ્ય
लेखक: श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
अनुवादक: प्रा. शशिन् ओझा, एम्. ए.
प्रकाशक: सस्तु साहित्यवर्धक कार्यालय.

'कण आणि क्षण' या श्री. श्री. वा. काळे यांच्या मराठी पुस्तकाचें हें गुजराती भाषांतर आहे. मध्यमवर्गीयांच्या व्यवहारांतील रोजच्या लहानसहान चुका सेळीमेळीनें दाखवून त्या दूर केल्यानें सुखी जीवनाची पाऊलवाट कशी सांपडेल हें या पुस्तकांत दाखविलें आहे. पुस्तक मराठींत एवढें लोकप्रिय झालें कीं थोड्याच महिन्यांत त्याची दुसरी आवृत्ति निघाली. गुजराती भाषांतराचे लेखक प्रा. शशिन् ओझा यांनीं भाषांतर साध्या, सरळ भाषेंत केलें आहे. मराठी लेखकांच्या अशा चांगल्या पुस्तकांचीं भाषांतरें आपल्या शेजारच्या भाषांत जितकीं अधिक होतील तितके निरनिराळ्या भाषिकांत अधिक जवळचे संबंध प्रस्थापित होण्यास मदत होईल.' —"सकाळ" १०-४-५५.

कण आणि क्षण
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)
पृ. सं. १६८. दुसरी आवृत्ति. किं. १॥ रु.
स्वतः वाचा, संग्रहीं ठेवा, भेटीदाखल द्या.

# मरणापूर्वी दोन किंवा जास्त वर्षांपूर्वी बक्षिस करून दिलेल्या इस्टेटीवर संपत्ति-कर बसेल काय ?

( लेखक : म. न. चांदुरकर, ॲडव्होकेट, नागपूर )

बक्षिसरूपानें इस्टेट दुसऱ्यास दिल्यानंतर बक्षिस केल्यापासून दोन वर्षांच्या आंतच जर दाता मरण पावला तर त्याचा परिणाम काय होतो हें आपण मागच्या लेखांत पाहिलें. बक्षिस करून दिल्यापासून दोन वर्षापेक्षा जास्त अवधि गेल्यानंतर जर दाता मरण पावला तर त्या इस्टेटीवर संपत्ति-कर बसेल काय हें आपण या लेखांत पाहूं. नेहमींच्या जीवनांत आपल्याला अशीं अनेक उदाहरणें सांपडतील की, अनेक लोक कांहीं कारणास्तव आपल्या मुलांच्या किंवा नातलगांच्या नांवानें कांहीं इस्टेट बक्षिस करून देतात आणि त्यानंतर ते अनेक वर्षे जिवंत राहतात व स्वतःच त्या इस्टेटीची देखभाल करून त्यापासून होणाऱ्या उत्पन्नाचा उपभोग घेतात. बक्षिस करून देण्याचा लेख जरी असला तरी त्या इस्टेटीवर ताबा दात्याचाच असतो. अशा परिस्थितींत असा प्रश्न उभा राहतो कीं, जर अशा रीतीचें बक्षिस करून दिल्यापासून जर कायद्यानें ठरविलेल्या कमींतकमी मुदतीनंतर म्हणजे दोन वर्षानंतर दाता मरण पावला तर त्या इस्टेटीच्या किंमतीवर त्याच्या वारसांना संपत्ति-कर द्यावा लागेल काय? बक्षिस केल्यापासून दोन वर्षानंतर दाता मरण पावला येवढ्यावरूनच संपत्ति-कर टळला असें समजणें चुकीचें आहे. अशा प्रकारच्या बक्षिसांच्याबाबत संपत्ति-कराच्या कायद्यांत क. १० टाकण्यांत आलें आहे. क. १० प्रमाणें केव्हांहि केलेल्या बक्षिसान्वयें मिळालेल्या इस्टेटीचा ताबा, दात्याच्या त्या इस्टेटीशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध न ठेवतां, जर बक्षिस घेणाऱ्या व्यक्तीनें तावडतोब घेऊन त्या इस्टेटीचा उपभोग घेण्यास सुरवात केली नसेल तर ती बक्षिस केलेली इस्टेट बक्षिस करणाऱ्याच्या मृत्यूनंतरच वारसांना मिळाली असें समजलें जाईल व त्या इस्टेटीवर संपत्ति-कर बसविण्यांत येईल. उदाहरणानें या कलमाचा अर्थ स्पष्ट होईल.

अ पांच लाख किंमतीच्या इस्टेटीचा मालक आहे. त्यानें ब आणि क या त्याच्या दोन मुलांना इस्टेटीचा कांहीं भाग बक्षिस-पत्रान्वयें बक्षिस दिला. वास्तविक ब व क यांनीं या इस्टेटीचा कधींहि ताबा घेतला नाहीं व त्या इस्टेटीच्या उत्पन्नाचा कधींहि उपभोग घेतला नाहीं. हें बक्षिस-पत्र करून दिल्यानंतर १५ वर्षांनीं अ मरण पावला. या सर्व अवधींत अ नेंच इस्टेटीच्या उत्पन्नाचा उपभोग घेतला असें समजूं. संपत्ति-कराच्या कायद्याप्रमाणें ब आणि क यांनीं तावडतोब आपला ताबा न केल्यामुळें व इस्टेटीच्या उत्पन्नाचा उपभोग अ च घेत असल्यामुळें ही इस्टेट ब आणि क यांना अ च्या मरणानंतरच मिळाली असें समजलें जाईल व त्या इस्टेटीच्या किंमतीवर संपत्ति-कर बसेल.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे खालील अटी पूर्ण झाल्याशिवाय बक्षिस करून दिलेल्या इस्टेटीवरील संपत्ति-कर टळणार नाहीं.

[ १ ] इस्टेटीचें हस्तांतर मरणापूर्वी कमींतकमी दोन वर्षे अगोदर व्हावयास पाहिजे.

[ २ ] बक्षिस मिळालेल्या इस्टेटीची मालकी व ताबा खरोखरच बक्षिस घेणाऱ्याचा असावयास पाहिजे आणि त्यानेंच त्या इस्टेटीचा उपभोग घ्यावयास पाहिजे.

[ ३ ] बक्षिस दिलेल्या इस्टेटीवर दात्याचा कोणत्याहि प्रकारचा अधिकार नको.

[ ४ ] दात्यानें स्वतःकरितां, बक्षिस दिलेल्या इस्टेटींत, कोणत्याहि रीतीनें फायदा किंवा उत्पन्न राखून ठेवावयास नको.

यावरून असें दिसून येईल कीं, बक्षिस दिलेल्या इस्टेटीवर संपत्ति कर बसूं द्यावयाचा नसेल तर मृत व्यक्तीचा, त्याच्या हयातींत, त्या इस्टेटीशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध नको. यदाकदाचित् बक्षिस दिलेल्या इस्टेटीशीं दात्याचा कांहीं काळ-पर्यंत संबंध जरी असला आणि मरणापूर्वी कमींतकमी दोन वर्षांचे अगोदर त्यानें तो संबंध तोडला असेल तरी देखील त्या इस्टेटीवर संपत्ति-कर बसणार नाहीं.

मरतेसमयीं बक्षिस दिलेल्या इस्टेटीशीं दात्याचा संबंध होता किंवा त्या इस्टेटीपासून होणाऱ्या उत्पन्नाचा उपभोग तो घेत होता असें ठरल्यास एकूण इस्टेटीच्या कोणत्या हिश्शावर संपत्ति-कर बसेल असा प्रश्न उभा होतो.

संपत्ति-कराच्या कायद्याप्रमाणें इस्टेटीच्या ज्या विभागाशीं मृत व्यक्तीनें संबंध ठेवला असेल किंवा ज्या विभागाची मालकी आणि ताबा स्वतःचा ठेवून स्वतःच उपभोग घेत असेल तित-क्याच प्रमाणांत म्हणजे एकूण इस्टेटीच्या किंमतीच्या तितक्या हिश्शावर संपत्ति-कर बसेल. उदाहरणार्थ (१) अ नें ब ला एक घर बक्षिस देतांना अशी अट टाकली कीं, अ ला त्याच्या हया-तींत व मरेपर्यंत त्या घरांत राहण्याचा हक्क आहे. अशा प्रकारचे बक्षिसाचा अर्थ अ नें त्या घरांत आपला हक्क राखून ठेवल्या-सारखा होतो आणि म्हणून बक्षिस मरणापूर्वी केव्हांहि केलें असलें तरी संपत्ति-कर बसवितांना घराची पूर्ण किंमत लक्षांत घेतली जाईल.

(२) अ नें त्याच्या मुलाला तीन घरें बक्षीस दिलीं परंतु मुलानें दोन घरांचा ताबा घेतला व तिसरें घर अ च्याच ताब्यांत राहून अ त्यांत मरेपर्यंत रहात असे. अ च्या मरणानंतर संपत्ति-कर बसविण्याच्या वेळीं या एकाच घराची किंमत विचारांत घेतली जाईल.

(३) अ हा आपल्या जमिनीचा पूर्ण मालक होता. त्यानें आपली जमीन व राहतें घर बक्षिसपत्रान्वयें आपल्या ब नांवाच्या पुतण्यास बक्षिस दिलीं. ब अ जवळ रहात असे व शेतीची देख-भाल तोच करीत असे. बक्षिस करून दिल्यावर अ मरेपर्यंत व जवळच त्या घरांत राहत असे. ब नें अ ला त्या घरांत राहूं द्यावें व अ चा खर्च चालवावा असा करार अ आणि ब यांचेमध्यें नव्हता. अ च्या मृत्यूनंतर बक्षिस दिलेल्या जमीन व घराच्या किंमतीवर संपत्ति-कर बसेल किंवा नाहीं असा प्रश्न ए. जी. वि. सेकोंब, [(१९११) २ कि. बेंच ६८८] या केसमध्यें उपस्थित झाला होता. त्यांत कोर्टानें असा निकाल दिला कीं, ब नें अ ला जरी मरेपर्यंत त्या घरांत राहूं दिलें तरी घराचा ताबा आणि उपभोग संपूर्णपणें ब च घेत असे. ब नें करारान्वयें किंवा इतर कोणत्या रीतीनें त्या इस्टेटींत कांहीं फायदा अगर हक्क राखून ठेवलेला नव्हता आणि म्हणून त्या इस्टेटीवर संपत्ति-कर बसविता येणार नाहीं.

उदाहरण—१ आणि ३ यांची तुलना केली असतां असें दिसून येतें कीं, दात्यानें करारान्वयें किंवा इतर कोणत्या रीतीनें बक्षिस दिलेल्या इस्टेटींत कांहीं हक्क राखून ठेवला असल्याशिवाय ती इस्टेट संपत्ति-करास प्राप्त होणार नाहीं.

तात्पर्य असें कीं, मरणापूर्वी केव्हांहि इस्टेट बक्षिस रूपानें हस्तांतरित केली असेल आणि जर मात्र दात्यानें त्या इस्टेटीशीं आपला संबंध पूर्णपणें तोडला नसेल तर त्या इस्टेटीवर दात्याच्या मरणानंतर संपत्ति-कर बसेल.

—"न्यायबोध", एप्रिल १९५५

## आयुर्विमा पॉलिसींचे उतरलेले दर

१९५४ च्या मार्च महिन्यापासून आयुर्विम्याचा व्यवसाय करणाऱ्या कांहीं मोठ्या कंपन्यांनीं हप्त्यांच्या दरांत कपात करण्याचें धोरण स्वीकारलें. तेव्हांपासून ह्या व्यवसायाशीं संबंध असणाऱ्या लोकांत एक प्रकारची अस्वस्थता पसरलेली आहे. वास्तविक विम्याचे दर उतरणें ही गोष्ट स्वागतार्हच समजली गेली पाहिजे. कारण, विम्याचे दर उतरल्यामुळें विमेदारांचा फायदा होतो आणि त्याचबरोबर विम्याच्या धंद्यालाहि जोराची चालना मिळते. शिवाय, लोक विम्याच्या हप्त्यासाठीं जी बचत सक्तीनें करतात तिचा ओघ अधिक मोठ्या प्रमाणांत सरकारी रोख्यांकडे वळतो. विम्याचे उतरलेले दर हे आतां बहुधा तसेच रहातील असें दिसतें. १९४७ सालीं ज्याप्रमाणें चलनवृद्धि झाली होती, तशी पुन्हां झाली तरच उतरलेले दर पुन्हां वाढण्याची शक्यता आहे.

मोठ्या कंपन्यांनीं दर कमी केल्याबरोबर मध्यम प्रतीच्या व छोट्या विमा कंपन्यांनाहि ह्या स्पर्धेत भाग घेणें अटळ झालें. अर्थशास्त्राच्या काटेकोर नियमाप्रमाणें दर उतरविणें वाजवी आहे किंवा नाहीं ह्या गोष्टीचा विचार करणें त्यांना शक्यच नव्हतें. विम्याचे दर उतरविण्याच्या धोरणासंबंधीं तीन कारणें देण्यांत आलीं आहेत :– (१) विमाकंपन्यांचे हप्त्यांचे दर मृत्युविषयक ज्या कोष्टकांवर आधारलेले होते तीं कोष्टकें २५ वर्षांपूर्वीचीं आहेत. हल्लीं विमा कंपन्यांच्या मृत्युविषयक अनुभवांत सुधारणा झाल्यामुळें नवीन उतरलेले हप्त्यांचे दर ठेवणें योग्यच झालें आहे, (२) विमा कंपन्यांनीं जे पैसे गुंतविलेले आहेत त्यांच्यावरील व्याजाचें उत्पन्न वाढलेलें आहे, आणि (३) कंपन्यांच्या कारभारविषयक खर्चांत बचत होण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे. कांहीं कंपन्यांनीं स्टाफ इन्शुअरन्स योजनांचा गैरफायदा घेतला अशा तक्रारी ऐकूं येत आहेत. संस्थांच्या नोकर-वर्गाचे अशा प्रकारचे विमे उतरतांना बऱ्याच विमा–कंपन्यांनीं आपल्या एजंटांमार्फतच तें काम मिळविलें. वरील प्रकारचा धंदा मिळवितांना असें करण्याची पद्धत सामान्यतः अवलंबित नाहींत. तथापि स्टाफ इन्शुरन्स योजनांविषयीं मुख्य तक्रार करण्यांत येत आहे ती वेगळीच आहे. ह्या योजनांखालीं विमे उतरणाऱ्या विमेदारांना, मार्च १९५४ पासून जे नवे दर अंमलांत आणले गेले, त्या दरांपेक्षाहि ११ पासून २२ टक्क्यांपर्यंत कमी असलेल्या विम्याच्या दराची सवलत देण्यांत आली. सामान्यतः अशा योजनांखालीं विमे उतरणाऱ्यांना ८ टक्क्यांपेक्षा अधिक सवलत देण्यांत येत नाहीं.

लाइफ इन्शुरन्स कौन्सिलच्या कार्यकारी समितीनें ह्या प्रश्नाचा तपशीलवार अभ्यास करण्यासाठीं एक उपसमिति नेमली होती. तिनें कार्यकारी समितीला केलेल्या अहवालांतील शिफारसी कार्यकारी समितीनें स्वीकृत केल्या आहेत. ह्या शिफारसींमुळें स्टाफ इन्शुरन्स योजना योग्य पद्धतीनें अंमलांत आणली जाईल असें दिसतें. ज्या विमा–पत्रकांवर दहा वर्षें अगर अधिक मुदतीसाठीं हप्ते भरावयाचे असतील त्यांच्या हप्त्यांत ८ टक्क्यांपेक्षा अधिक सूट दिली जाणार नाहीं; इतर प्रकारच्या विमा–पत्रकांच्या हप्त्यांत ही सूट ५ टक्क्यांपेक्षा अधिक दिली जाणार नाहीं.

## को–ऑपरेटिव्ह बँकांचें महत्त्वाचें स्थान

शिरसी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा सुवर्ण–महोत्सव बॉंबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष श्री. आर. जी. सरय्या ह्यांच्या हस्तें साजरा झाला. ह्याप्रसंगीं बोलतांना श्री. सरय्या म्हणाले कीं, भारताच्या अर्थव्यवस्थेंत सहकारी बँकांनीं पुढाकार घेण्याचे दिवस आलेले आहेत. सहकारी बँकांबाबत कर–चौकशी मंडळानें कांहीं शिफारशी केलेल्या आहेत. त्या अंमलांत आणण्याचा निर्णय जर सरकारनें घेतला तर सहकारी बँकांचें भवितव्य अधिक निश्चित झाल्याशिवाय राहणार नाहीं. मुंबई राज्यांत सुमारें १६६ बँका आहेत. तथापि कर्नाटक भागांत मात्र सहकारी बँकांची संख्या अवघी १६ असल्याबद्दल त्यांनीं आश्चर्य व्यक्त केलें. ते पुढें म्हणाले कीं, बँकांनीं केवळ व्यक्तींनाच साह्य करावें असें नाहीं; तर व्यापार, उद्योग आणि शेतीव्यवसाय ह्यांनाहि जरूर पडल्यास मदत करण्यास त्यांनीं पुढें आलें पाहिजे. सहकारी बँकांच्या कारभारांत सरकार हस्तक्षेप करतें ह्या आरोपाचें त्यांनीं खंडन केलें. सुवर्ण–महोत्सव साजरी करणारी ही दुसरी बँक आहे. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. केशवन् ह्यांनीं श्री. सरय्या ह्यांचें स्वागत करतांना बँकेच्या ५० वर्षांतील कार्याचा आढावा घेतला. कारवार जिल्ह्यांतील सहकारी संस्थांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची एक परिषद शिरसी येथें नुकतीच भरविण्यांत आली होती. निरनिराळ्या सहकारी संस्थांचे ५०० प्रतिनिधी परिषदेला हजर होते.

## भारताच्या दरडोई उत्पन्नांत वाढ

१९४८–४९ सालापासून १९५३–५४ पर्यंतच्या कालांत वस्तूंच्या किंमती स्थिर आहेत असें धरल्यास, भारताच्या दरडोई उत्पन्नांत ८ टक्के वाढ झाल्याचें दिसून आलें आहे. १९५१–५२ सालीं भारताचें राष्ट्रीय उत्पन्न ९,९९० कोटी रुपये होतें. १९५२–५३ सालीं तें ९,८६० कोटी रुपये होतें आणि १९५३–५४ सालीं ते १०,६०० कोटी रुपये झालें. मध्यवर्ती सरकारच्या आंकडेविषयक खात्याच्या दुसऱ्या वार्षिक अहवालांत वरील माहिती देण्यांत आली आहे. १९५१–५२ सालीं भारतांतील दरडोई उत्पन्नाचा सरासरी आंकडा २७४·५ रुपये होता. १९५२–५३ सालीं तो २६७·४ रुपये होता आणि १९५३-५४ सालीं तो २८३·९ रुपये झाला. १९५२–५३ सालाच्या उत्पन्नाचा जो अंदाज करण्यांत आला आहे तो त्यापूर्वीच्या तपशीलवार अंदाज करण्याच्या पद्धतीप्रमाणें करण्यांत आला आहे. १९५३–५४ सालचा अंदाज मात्र अपुऱ्या माहितीच्या आधारावर करण्यांत आला आहे. त्यामुळें तो दुरुस्त करावा लागण्याचा संभव आहे. १९५१–५२ सालाशीं तुलना करतां १९५२–५३ सालचें राष्ट्रीय उत्पन्न १८० कोटींनीं म्हणजे १·३ टक्क्यांनीं घटलेलें आढळून येतें. तथापि ह्या वर्षांतील किंमतीच्या पातळींचा विचार करता १९५१–५२ सालापेक्षा १९५२–५३ सालांत ३·९ टक्के इतकी वाढ राष्ट्रीय उत्पन्नांत खऱ्या अर्थानें झालेली दिसून येते. १९५२–५३ पासून १९५४–५३ पर्यंतच्या कालांत राष्ट्रीय उत्पन्नाची टक्केवारी वाढ ४·५ टक्के झालेली दिसून येते.

**अरुंद रुळाचा नवा रेल्वे–मार्ग**—पश्चिम रेल्वेच्या रस्त्यांत भिलाडी–राणीवाडा ह्या नव्या अरुंद रुळाच्या रेल्वे–रस्त्याची भर पडणार आहे. कांडला आणि दिल्ली ह्यांना जोडणारा हा एक नवाच मार्ग उपलब्ध होणार आहे. शिवाय ह्या मार्गानें सौराष्ट्र, कच्छ, आणि राजस्थान राज्यांतील अरुंद रुळांचे रेल्वे–मार्ग जोडले जातील.

## भोर स्टेट बँकेची भोर येथें मालकीची इमारत

### जिल्हाधिकारी, श्री. चिन्मुळगुंद, ह्यांचे हस्तें प्रारंभ

भोर स्टेट बँकेनें आपल्या भोर येथील मुख्य कचेरीसाठी राजवाडा चौकानजीक इमारत खरेदी केली असून, सदर ठिकाणीं आतां बँकेस योग्य असा फेरफार करून इमारतीचे बांधकामास सुरुवात करण्याचा मुहूर्त सोमवार दिनांक २५-४-५५ रोजीं अक्षय्यतृतीयेच्या सुमुहूर्तावर पुणें जिल्ह्याचे कलेक्टर मा. चिन्मुळगुंद आय. सी. एस. यांचे हस्तें झाला. प्रथम बँकेचे चेअरमन श्री. म. व्यं. शिंगरे यांचे हस्तें धार्मिक पूजा व विधि झाला. विद्वान् ब्राह्मणांनीं मंत्रघोष करून शुभाशिर्वाद दिले. त्यानंतर श्री. चिन्मुळगुंद यांनीं पूजा करून उत्खननाचा सुमुहूर्त केला. यानंतर राजवाड्यांतील राममंडपांत सभा झाली. या ठिकाणीं गांवांतील सुमारें ४००।५०० प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. त्यामध्यें बँकेचे संचालक मंडळाचे सभासद, अॅ. बो. चे सदस्य, सबजज्ज, तालुक्याचे मामलतदार, वकील मंडळी, भोर नगरपालिकेचे अध्यक्ष, भोर येथील व्यापारी व कारखान्यांचे चालकहि हजर होते.

प्रथम सुप्रसिद्ध दरबारगायक श्री. वाकणकर यांनीं ईशस्तवन व स्वागतपर पद्य म्हटलें. त्यानंतर बँकेचे चेअरमन श्री. म. व्यं. शिंगरे यांनीं भाषण केलें. श्री. म. व्यं. शिंगरे यांचे भाषणानंतर समारंभाचे अध्यक्ष श्री. पी. जे. चिन्मुळगुंद यांनीं भाषण करतांना प्रथम निमंत्रणाबद्दल आभार मानून बँकेच्या अहवालावरून बँकेची आर्थिक परिस्थिति उत्तम असल्याचा अभिप्राय दिला. बँकेचे एकूण खेळतें भांडवलापैकीं ½ रक्कम व ठेवींपैकीं सुमारें ५० टक्के रक्कम कर्ज व कॅशक्रेडिटमध्यें गुंतविली आहे. यावरून बँकेस कारखानदार, व्यापारी यांस आणखी कर्ज अगर कॅश क्रेडिट देतां येईल असें दिसतें व तें देण्याचा संचालक मंडळानें विचार करावा असें सुचविलें. नवीन स्थापन होणाऱ्या स्टेट बँकेबद्दल विचार व्यक्त करतांना ते म्हणाले कीं, अजूनपर्यंत याबाबत निश्चित कल्पना काय आहेत हें समजण्याला मार्ग नाहीं. तथापि, सरकार अशा संस्थांच्याबाबत भागीदारी पत्करणार आहे, हें योग्यच आहे. तथापि, लहान लहान बँका लहान व्यापारी व कारखानदारांस उपयुक्त असल्यानें त्यांचें अस्तित्व टिकविणें जरूर आहे. बँकेनें स्वतःची इमारत करण्याचें ठरविलें हें योग्यच आहे. या नवीन इमारतींमध्यें सेफ डिपॉझिटची व्यवस्था बँक करणार आहे, हें योग्यच आहे. अशा सोईची जरूरी आतां लोकांना भासूं लागली आहे. शेवटीं बँकेस तिच्या कामकाजांत त्यांनीं यश चिंतिलें.

बँकेचे उपाध्यक्ष श्री. ना. पां. थोपटे यांनीं सर्वांचे आभार मानले. नंतर राष्ट्रगीत व पानसुपारी व सर्वांस अल्पोपहार झाला. श्री. पी. जे. चिन्मुळगुंद यांनीं बँकेसहि भेट देऊन कामकाजाबद्दल आस्थेनें चौकशी केली.

---

### सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्ग, पारनेर

सोसायट्यांच्या अनट्रेन्ड सेक्रेटरीसाठी व व्ह. फा. अगर तत्सम परीक्षा पास असलेल्या बाहेरील शिक्षणेच्छूसाठी ६ ते ७ आठवड्याचा शिक्षणवर्ग ता. ९-५-१९५५ पासून मु॥ पारनेर जिल्हा अहमदनगर येथें सुरू होत आहे. संगमनेर, घोडनदी, श्रीगोंदा इत्यादि भागांतील सेक्रेटरींनाहि ह्या वर्गाचा फायदा घेतां येईल. तीन रुपये प्रवेश फीसह ता. ५-५-१९५५ चे आंत मे. सेक्रेटरी, नगर जिल्हा सहकारी बोर्ड जि. अहमदनगर ह्या पत्त्यावर अर्ज पाठवावेत.

### साखरेच्या धंद्याचा प्रश्न पुनः बिकट होणार काय ?

" भारतांतील साखरेचा दरमाणशी खप उतरला आहे. चालू वर्षाचा एकूण खप १५ लक्ष टन, म्हणजे गेल्या वर्षीपेक्षां ३ लक्ष टन कमी होईल. उत्पादन मात्र ५०% वाढलें आहे. गेल्या वर्षी १० लक्ष टन साखरेचें उत्पादन झालें. चालू वर्षी तें १५ लक्ष टन होईल. भारत सरकारनें ५ लक्ष टन साखर आयात करण्याचें ठरविलें आहे, त्या साखरेची ह्यांत भरच पडणार आहे. साखरेची विक्रीची किंमत उतरली, पण उत्पादन-खर्च वाढला अशी बिहारमध्यें परिस्थिति निर्माण झाली आहे आणि सरकारनें तात्काळ उपाययोजना केली नाहीं, तर कित्येक कारखाने बंद पडतील. सरकारनें साखरेची आयात बंद करावी, साखरेचा साठा बाजारांत पद्धतशीरपणें आणावा व नवी एक्सा-इज पट्टी रद्द करावी." इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. भरत राम, ह्यांनीं दिल्ली येथें पत्रकारांचें पुढें वरीलप्रमाणें निवेदन केलें. ह्याच दिवशीं, मध्यवर्ती सरकारचे अन्नमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख हे म्हणाले कीं, उंसाखालील लागवडीचें क्षेत्र वाढलें नसलें तरी चालू वर्षी साखरेचें उत्पादन आतांपर्यंतच्या कोणत्याहि वर्षीपेक्षां जास्त होईल. एकीकडे खप कमी होत चालला आहे आणि दुसरीकडे उत्पादन वाढून साठे वाढण्याचा रंग दिसत आहे. साखरेच्या धंद्याचा प्रश्न पुनः बिकट होणार कीं काय ?

---

### मुंबई राज्यांत सुमारें ३६,००० गांवें

मुंबई राज्यांत लोकवस्तीची ३५,७८८ गांवें असून दोन गांवें ओस पडलेलीं आहेत आणि दोन वाड्या आहेत. २८ जिल्ह्यांच्या एकूण २०४ तालुक्यांत आणि महालांत हीं गांवें येतात. जिल्हावार गांवांची संख्या पुढीलप्रमाणें आहे:—

बनासकांठा १,३२८; साबरकांठा १,५८१; मेहसाणा १,२७३; अमरेली ३५४; बडोदें १,७१७; डांग ३१३; अहमदाबाद ७७४; खेडा १,००१; पंचमहाल १,९८६; भडोच १,२९३; सुरत २,०११; ठाणें १,७३६ मुंबई उपनगर ५३; अहमदनगर १,३३४; पूर्व खानदेश १,५०२, पश्चिम खानदेश १,४७८; नाशिक १,६९४; पुणें १,५३९; उत्तर सातारा १,१७७; सोलापूर ९५५; कुलाबा १,९६४; बेळगांव १,३९९ विजापूर १,३०२; धारवाड १,६१५; कारवार १,३६१; रत्नागिरी १,५५१; दक्षिण सातारा ५३१; कोल्हापूर ९६८.

१९५१ च्या शिरगणतीप्रमाणें मुंबई राज्याची एकूण लोक-संख्या ३५९.४४ लाख इतकी असून त्यांत बृहन्मुंबईची लोक-संख्या २८.३९ लाख आहे.

---

### रिझर्व्ह बँकेचे श्री. भंडारी ह्यांचा मृत्यु

रिझर्व्ह बँकेचे मॅनेजर, श्री. एल्. आर. भंडारी, हे दि. २८ एप्रिल रोजीं मृत्यु पावले. ते ५२ वर्षांचे होते. रिझर्व्ह बँकेच्या इमारतीवरतीच त्यांची राहाण्याची जागा होती. गच्चीवर संध्या-काळीं येरझाऱ्या घालता घालता ते एकाएकीं खालीं पडले. दोन-तीन दिवस त्यांना बरें वाटत नव्हतें.

---

**राजस्थानांतील शिक्षणप्रसार**—माध्यमिक-शिक्षण-समि-तीनें केलेल्या शिफारशी अंमलांत आणण्याचें राजस्थान सरकारच्या शिक्षण खात्यानें ठरविलें आहे. समितीनें सुचविलेल्या योजना चालू करण्यासाठी राज्य-सरकारनें ४६,८२,००० रुपयांच्या रकमेची तरतूद केली आहे.

## सांगली बँकेच्या कोल्हापूर शाखेचें उद्‌घाटन

सांगली बँक लि. च्या कोल्हापूर शाखेचें उद्‌घाटन तेथील उद्योगपति, श्री. मदनमोहन लोहिया, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं दि. २५ रोजीं झालें. बँकेचे एक डायरेक्टर, श्री रेठर वकील, ह्यांनीं प्रास्ताविक भाषण केलें व मॅनेजर श्री. गुप्ते ह्यांनीं बँकेच्या प्रगतीचा वृत्तांत सांगितला. श्री. जोशी ह्यांनीं आभारप्रदर्शनाचें भाषण केलें. शाखा डॉ. मिरजे ह्यांच्या इमारतींत सुरू झाली आहे.

**इजिप्त–रशिआ व्यापारी करार** – इजिप्त आणि रशिआ ह्या देशांनीं परस्परांत ऐनजिनसी व्यापारी करार केला आहे. कराराच्या अटींप्रमाणें उभयतां देशांच्या दरम्यान १७४२,५०० पौंड किंमतीच्या मालाची अदलाबदल होईल. इजिप्तनें रुमेनिअन सरकाराशींहि १४,३५,५०० पौंड किंमतीच्या मालाच्या व्यापारी देवघेवीचा करार केला आहे.

**गाईच्या शेणाचा नवा उपयोग**—इज्जतनगर येथील पशुसंवर्धनविषयक संस्थेंत करण्यांत आलेल्या आहारासबंधीच्या प्रयोगावरून असें दिसून आलें आहे कीं गाईच्या शेणाचा, उपयोग कोंबड्यांच्या आहारासाठीं करून त्यांचीं अंडीं घालण्याची शक्ति वाढवितां येते कोंबड्याच्या आहारांत ज्या प्रथिनांची आवश्यकता असते, तीं प्रथिनें गाईच्या शेणांत आढळून आलीं आहेत.

**राष्ट्रीय नाट्यगृहाची मागणी**—म्हैसूर राज्यांत एक राष्ट्रीय नाट्यगृह बांधण्यांत येऊन त्याचा उपयोग नृत्य, नाटक आणि संगीत ह्यांना उत्तेजन देण्यासाठीं करण्यांत यावा, असा खास ठराव म्हैसूर लेजिस्लेटिव्ह कौन्सिलनें मंजूर केला आहे. हा ठराव स्टेट अॅकॅडमीकडे आणि एतद्विषयक मध्यवर्ती संस्थेकडे पाठविण्याचें आश्वासन सरकारतर्फे देण्यांत आलें.

**भारताला अमेरिकन मोटारी मिळणार**—भारत आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान भारताला मदत करण्याचा जो करार झाला आहे, त्याला अनुसरून अमेरिकेकडून १०,५५,००० डॉलर्स किंमतीच्या मोटारगाड्या विकत घेण्याची परवानगी देण्यांत आली आहे.

**चित्तरंजन कारखान्याची प्रगति**—चित्तरंजन येथील आगगाड्यांच्या एंजिनांच्या कारखान्यांत २०० वें एंजिन नुकतेच तयार झालें. हे एंजिन राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांनीं प्रथम चालविलें ह्याप्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, कारखान्याच्या प्रगतीचा वेग असाच चालू राहिल्यास भारत स्वतःच्या गरजा तर भागवीलच; पण लवकरच एंजिनें निर्यातहि करूं लागेल.

**पाकिस्तानची कापडाची आयात** – पाकिस्तान पश्चिम जर्मनीकडून ५ लाख डॉलर्स किंमतीचें सुती कापड आणि सूत आयात करणार आहे. अमेरिका इतक्याच किंमतीचा कापूस जर्मनीला पुरविणार आहे. गेल्या वर्षी अमेरिकेनें पाकिस्तानला ११ कोटी डॉलर्सची आर्थिक मदत दिली होती. त्या मदतीमधून वरील व्यवहार करण्यांत येत आहे.

**म्हैसूर राज्यांतील नवा कारखाना** – विजेनी भारी यंत्र सामुग्री तयार करण्याचा एक कारखाना म्हैसूर राज्यांत काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठीं २० कोटी रुपयांचें भांडवल लागेल असा अंदाज आहे. कारखान्याची संकल्पित योजना तयार असून ती आंखण्याच्या कामीं एका जर्मन कंपनीचें साह्य घेण्यांत आलें आहे.

## LORD REAY MAHARASHTRA INDUSTRIAL MUSEUM, POONA

Has received the following books :

(1) **Rural Crafts** by Norman Wymer Publishers Oxford University Press. pp. 127. Price Rs. 5/-.

(2) **Medicinal Plants of India & Pakistan** by J. F. Dastur, F. N. I. Published by J. H. Taraporewala for D. B. Taraporewala, Hornby Road, Fort, Bombay. pp. 317. Price: Rs. 5-14/-.

(3) **Useful Plants of India & Pakistan** by J. F. Dastur, F. N. I. Published by J. H. Taraporewala for D. B. Taraporewala, Hornby Road, Fort, Bombay. pp. 260. Price: Rs. 5-14/-.

(4) **Cottage Industries and Agriculture in Japan** by Diwan Chamanlal, Published by New Book Co. Ltd., Hornby Road, Bombay. pp. 194. Price: Rs. 12-8/-.

(5) **Oxford Junior Encyclopaedia, Vol. VI.** Farming and Fishing Published by Oxford University Press. pp. 494. Price: 30 s. nett.


# बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल | रु. १२,५०,००० |

भवानी पेठेतील शाखा
ता. २८-४-१९५५ पासून
डेक्कन जिमखाना चौकांत
सुरू झाली.

मुख्य कचेरी :—४५५ रविवार, पुणें

शाखा:—(१) सदाशिव पेठ, पुणें १
(२) डेक्कन जिमखाना, पुणें ४.
(३) सोलापूर (४) सांगली

★

पुणें व सांगली येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय.
बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

★

जी. जी. साठे — मॅनेजर
डी. आर. नाईक जे. पी. — चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी ए. यांनीं 'दुर्गाभिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.